## शोध निबंध

डॉ. हनुमंत भुमकर
के.एस.के.कॉलेज, बीड

### सुवर्ण महोत्सवी महाराष्ट्रः राजकीय मुल्यांकन

सुवर्ण महोत्सवी महाराष्ट्राचा त्रिकालवेध घेताना गेल्या पन्नास वर्षाचा जमाखर्च मांडावा लागणार आहे. काय कमावल आणि काय बाकी राहीले हा प्रश्न विचारावा लागणार आहे. काय कमावले आणि काय बाकी राहीले याचे उत्तर मिळाल्याशिवाय भविष्यातील वाट सापडणार नाही. शिवाय या प्रश्नांची उत्तरे शोधतांना कोणतेही पुर्वग्रह बाळगून चालणार नाही. गेल्या 50 वर्षाची आपली कमाई मोठी आहेच पण बाकीही मोठी आहेच. एक मात्र निश्चित निराश व्हावे अशी स्थिती अजिबात नाही. आपल्याला जे गाठायचे आहे ते अद्याप बरेच दूर ओ ते खरे पण रस्ता चुकलेला नाही. ज्या दिशेने जायचे त्याच रस्त्यावर आपण आहोत आणि योग्य बसमध्ये आहोत मुद्या आहे तो गतीचा धारण्याच्या इच्छाशक्तीचा खरे म्हणजे पन्नास वर्षे हा कालावधी राज्याच्या इतिहासाच्या दृष्टीने मोठा नसतो. महाराष्ट्राचा सुवर्ण महोत्सवी प्रवास तर आणखी वेगळा आहे. कारण आकार देणारा असा हा कालखंड आहे. 1947 मध्ये स्वतंत्र झालेला देश 1950 मध्ये प्रजासत्ताक झाला आणि भाषावर प्रांतरचनेने जोर धरल्यानंतर एका तेजस्वी लोकलढयातून महाराष्ट्र नावाचा नवा समुदाय साकार झाला तो 1960 मध्ये गेल्या 50 वर्षापैकी बहुतांश काळा महाराष्ट्राला आकार मिळण्यात खर्ची पडला आहे. याच काळात सर्व स्तरावर महाराष्ट्राची जडण–घडण झाली आहे. जमाखर्च मांडताना हा मुद्या नजरेआड करून चालणार नाही. एका अर्थाने पायाभरणीची ही वर्षे आहेत. या पायावर आपल्याला आता उद्याचा महाराष्ट्र उभा करावयाचा आहे. प्रगतीच्या दिशेने वाटचाल करतांना ही कमाई महत्वाची ठरणार आहे. ज्या अनेक संधी आपल्या हातून गेल्या त्या परत मिळवणे हे ही तेवढेच प्राधान्याने आहे. जागतिकीकरणाने प्रगतीचे–अर्थकारणचे समाजशास्त्र सगळे संदर्भ बदलून टाकलेले असतांना महाराष्ट्राचा विचार नव्याने करावा लागणार आहे.

गेल्या 50 वर्षात महाराष्ट्राला प्रगथीपथावर नेण्यात 15 मुख्यमंत्र्याचा वाटा अनन्यसाधारण आहे. महाराष्ट्राच्या विकासासाठी त्यांनी केलेले प्रयत्न हा एक राजकीय सामाजिक इतिहास आहे. महाराष्ट्राची जडण–घडण कशी होत गेली हे जाणून घेण्यासाठी या मुख्यमंत्र्याची कारकिर्द महत्वाची ठरते.

आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार म्हणून यशवंतराव चव्हाण यांचा गौरव केला गेला आहे. महाराष्ट्राच्या मातीत जन्माला आलेल्या या व्यक्तिमत्वाचे महाराष्ट्राची आणि मराठीची अस्मिता आयुष्यभर जोपासली. राजकारण, समाजकारण, अर्थकारण सहकार शिक्षण आणि साहित्य या सारख्या विविध क्षेत्रांतून कर्तबगारीने आणि सातत्याच्या संचाराने यशवंतराव चव्हाणांनी आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविला आहे.

यशवंतराव चव्हाण नंतर मारोतराव कन्नमवार हे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले त्यांनी महत्वाचे संरक्षण प्रकल्प महाराष्ट्रात आणले. त्याच्यानंतर वसंतराव नाईक यांची मुख्यमंत्री म्हणून एक तपाची कारकिर्द स्थैर्य व गतिमान विकास यासाठी उल्लेखनीय ठरली. दोन युध्दे तीन मोठी राज्यव्यापी अवर्षण यासारख्याा संकटांना तोंड देतानाच त्यांनी हरितक्रांती घडवून आणली.त्यांच्या नंतर चारित्र्य संपन्न आणि शिस्तशीर मुख्यमंत्री म्हणून शंकरराव चव्हाण याची ओळख आहे. राज्यातील पाटबंधारे प्रकल्पाला जडण–घडणीत त्यांचे मोलाचे योगदान आहे. जायकवाडी हा राज्यातील सर्वात मोठा प्रकल्प शंकररावांच्या विकास विषयक दृष्टीकोनाचे मानचिन्ह आहे. विष्णू पूरी हा अशिया खंडातील सर्वात मोठा उपसा जलसिंचन हा प्रकल्प उभारून शंकररावांनी आपले कार्यकर्तव्य सिध्द केले. याशिवाय उजणी इसापूर, पैनगंगा, अप्पर मांजरा अशी प्रकल्पांची मालिकच निर्माण करण्यात आली. या शिवाय कापूस एकाधिकार योजना, घरकूल योजना, ऊर्दू अकादमीची स्थापना, गृहनिर्माण मंडळ आदिवासी आश्रमशाळा रेल्वे रूंदीकरण या सारखे कार्यक्रम राबविण्यात आले. यानंतर वसंतदादा पाटील यासारखे मुख्यमंत्री बनले. त्यांनी शेतमजुरासाठी किमान वेतन, महिला सबलीकरण धोरण, सहकार चळवळ गतिमान केली वीज दरात सवलत फलोत्पादनास प्रोत्साहन , ठिबक सिंचनाचा प्रसार कृषी प्रक्रिया उद्योगांना चालना कृषी संशोधनावर भर त्यांनी दिला. मोफत दुध योजना, मुलींना मोफत शिकवण इत्यादी कार्यक्रम राबविले.

यानंतर महाराष्ट्राच्या मुख्यमंत्री पदी बॅरीस्टर अब्दुल रहमान अंतुले त्यांनी तडाखेबाज निर्णय घेऊन ते धडाकेबाज अंमलात आणणरे मुख्यमंत्री म्हणून बॅरीस्टर अब्दुल रहमान अंतुले यांच ख्याती आहे. यानंतर बाबासाहेब भोसले मुख्यमंत्री पदी आले त्यांनी श्रमजीवी कुटूंबाश्रय योजना सुरू केली. दहावी पर्यंत मोफत शिक्षण देण्याचा निर्णय घेतला. त्यांनंतर शिवाजीराव पाटील निलंगेकर मुख्यमंत्री झाले त्यांनी मराठवाडा विकासासाठी 42 कलमी , विदर्भ विकासासाठी 33 कलमी तर कोकण विकासासाठी 40 कलमी कार्यक्रम हाती घेण्यात आला.

यानंतर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून सुधाकरराव नाईक आले त्यांनी पाणलोट क्षेत्राचा विकास हे धोरण राबविले. जिल्हा परिषद अध्यक्षांना राज्यमंत्रीपदाचा दर्जा त्याच्याच कारकिर्दीत मिळाला. अल्पसंख्यांक विकासासाठी अल्पसंख्यांक आयोगाची स्थापना त्यांनी केली. त्यानंतर मनोहर जोशी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले त्यानी मुंबईतील उड्डाणपूल, झुणका भाकर केंद्र योजना, नविन शैक्षणिक धोरण, मातोश्री वृध्दाश्रम योजना, जाहीर केल्या आणि राबविल्या . त्यानंतर नारायण राणे मुख्यमंत्री झाले त्यांनी राज्यातील शासकीय कर्मचाऱ्यांचया सेवानिवृत्तीचे वया 60 वर्षावरून 58 वर्षे करण्याचा महत्वपूर्ण व धाडसी निर्णय त्यांनी घेतला. जिजामाता महिला आधार विमा योजना बळीराजा संरक्षण विमा योजना यासारख्या योजना सुरू करण्यात आल्या.यानंतर विलासराव देशमुख मुख्यमंत्री झाले. त्यांनी संत गाडगे महाराज स्वच्छता अभियानाला गती देण्याचे काम त्यांनी केले. महाराष्ट्र सहकार वित्त व विकास मंडळ,

अल्पसंख्यांक विकास मंडळाची स्थापना त्यांच्याच काळात झाली. राज्यात गुटखा बंदी, डान्स बार बंदी यासारखे महत्वकांक्षी निर्णय त्यांनी घेतले, तसेच विद्युत मंडळाचे विभाजन केले. यानंतर सुशिलककुमार शिंदे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री बनले त्यांनी अनुसुची जाती व बालहक्क आयोगाची स्थापना , तसेच राज्यात विज चोरी रोखण्यासाठी स्वतंत्र न्यायालय उभारण्याचा महत्वाचा निर्णय त्यांनी घेतला. त्यानंतर अशोक चव्हाण महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले त्यांनी केंद्र शासनाचा कर्जमाफीचा लाभ न झालेल्या 40 लाख शेतकऱ्यांना 6208 कोटी रूपयाची कर्ज माफी देण्याचा महत्वकांक्षी निर्णय त्यांनी घेतला. महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेचा प्रारंभ करून मजूरीच्या दरात वाढ केली. मोठया प्रमाणात नौकर भरती राबविली अशा प्रकारे महाराष्ट्रातील राजकीय नेतृत्वाने रोजगार हमी योजना, माहितीचा अधिकार कायदा 2005 , तंटामुक्त अभियान स्त्री भ्रूमणहत्या प्रतिबंध कायदा, निर्मल ग्रामीण आरोग्य अभियान, संत गाडगे बाबा ग्राम स्वच्छता अभियान आदि धोरणे राबविण्यात महाराष्ट्रात देशात अग्रेसर राहीला आहे. परंतू आता पर्यंत जे नेतृत्व निर्माण झाले ते कधी पक्षीय नेतृत्वाने लादलेले नेतृत्व होते तर कधी स्वकर्तृत्वाचे निर्माण झालेले नेतृत्व होते. तर कधी जातीच्या आणि धर्माच्या नावावर निर्माण झालेले नेर्तृत्व होते. सन 1978 आणि 1995 ते 2000 हा काळ सोडला तर महाराष्ट्राचे नेतृत्व हे कॉंग्रेस पक्षाने लादलेले नेतृत्व होते. त्यामुळे एक पक्षीय वर्चस्व महाराष्ट्रात निर्माण झाले. परंतू 1990 नंतर आघाडी सरकार बनत गेले. आणि एक पक्षीय वर्चस्वाचा ऱ्हास झाला.

वरील सर्व राजकीय नेतृत्वांनी जरी महाराष्ट्राचा कायापालट केला असला तरी आजही महाराष्ट्राच्या विकासासाठी प्रादेशिक समतोल निर्माण केला पाहिजे. तसेच पश्चिम महाराष्ट्राप्रमाणे विदर्भ मराठवाडा व कोकणात सदृढ, सहकारी पतसंस्था निर्माण व्हाव्यात. बंदर प्रमुख रस्ते, रेल्वे मार्ग, विमान मार्ग, विज पुरवठा , पत पुरवठा व गुंतवणूक दाराना आकर्षिक करण्यासाठी नव्या व एकात्मिक धोरणाची आवश्यकता आहे तसेच भ्रष्टाचार मुक्त, पारदर्शक कारभार, सामाजिक स्वास्थ, राष्ट्रीय एकात्मता, सामंजस्य व पुरोगामी चळवळींना शासनाने प्रोत्साहन देण्याची आवश्यकता आहे तसेच दहशतवादाला आणि नक्षलवादाला मुठमाती देण्याची गरज आहे अशाच परिस्थितीत महाराष्ट्राचा सुवर्ण काळ आल्याशिवाय राहणार नाही.

**संदर्भः**


1) महाराष्ट्र शासन आणि राजकारण – प्रा. के.आर. बंग

2) महाराष्ट्र शासन आणि राजकारण – प्रा. भिवसनकर के.एस.

3) यशवंतराव ते विलासराव – मधुकर भावे

4) लोकराज्य – एप्रिल मे 2010

5) राजकीय विकास आणि सहकार चळवळी – बावीस्कार बी.एस.

6) महाराष्ट्रच राजकारण – एम.एस.रॉय आणि फ्रान्सीस फ्रॅंकेल